International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# कृषिप्रधान ग्रामीण जीवनाची बहुमितीय व्यथा मांडणारी कादंबरी : विजेने चोरलेले दिवस .

[1]प्रा. विक्रम उकर्डा मोरे (संशोधक), [2]प्रोफेसर डॉ.शिवाजी नागरे (मार्गदर्शक)

गो.से.विज्ञान,कला आणि वाणिज्य महाविद्यालय, खामगाव जिल्हा बुलढाणा.
शंकरलाल खंडेलवाल कला, विज्ञान ,वाणिज्य महाविद्यालय, अकोला (महाराष्ट्र)

वास्तववादी कादंबरीची प्रदीर्घ परंपरा मराठी ग्रामीण कादंबरीला लाभली आहे. समकालीन ग्रामीण समाजाचं कृषी केंद्रित समाजजीवन अधिकाधिक शोषित वंचित आहे. केवळ नावालाच तो' बळीराजा' परंतु कायम या व्यवस्थेत शेती आधारित जीवनाची हेडसांड होते. यामध्ये अडते, व्यापारी,शासक, नोकरशहा , कारखानदार, सावकार,बँका, आयात निर्यात धोरण, मोठ्या धरणं बांधनीचे प्रकल्प, बुलेट ट्रेनचा प्रकल्प त्यात जाणाऱ्या सुपिक जमीनी, प्रकल्प विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या जमिनी घेऊन त्यांना विस्थापित व्हावे लागले आहे., सेझ ,समृद्धी सारखे महामार्ग कृषीप्रधान समाज व्यवस्थेला धक्का देत आहेत. याबाबतीत काही जाणकार ग्रामीण भागातील सजगलेखक विचार करून लागले आहेत . अवतीभवतीच शेतकरी समाज त्यांच्या दिवसागणिक वाढतच जाणाऱ्या आत्महत्या, बेरोजगारी, व्यसन, लुटालूट हे वास्तव जीवन अनुभव गाठीशी असल्याने ग्रामीण प्रश्नांची जाणीव, प्रगल्भता, संवेदनशीलता एखाद्या प्रश्नांच्या खोलात जाऊ वेध घेणारी कृषी केंद्रित मानसिकता हीच 'कृषीप्रधान' कादंबरीला जन्मास घालते.कृषिकेंद्रीत जीवनाची वाताहत शेती व्यवसायामुळे झाली, बदलत्या काळानुसार शेतीनिगडीत विविध प्रकारचे प्रश्नां उद्भवू लागले, शेती व्यवसायात खूप स्थित्यंतरे झाली . सरकारचे शेतीविषयक धोरण भांडवली व्यवस्थेला मजबूत करण्यासाठी तयार करण्यात आले. कारखान्यास विज मुबलक आणि शेतीसाठी लोडशेडींग,आंतरराष्ट्रीय व्यापार ,मालाची साठेबाजी, कृतिम खतटचाई, सिंचनाच्या सोयीतील नवीन तंत्रज्ञान, इत्यादी घटकांनी मिळून शेतीनिष्ठ जीवनाची हेडसांड झाली.शेतीत उत्पादन वाढीले, पण नफा जेमतेम मिळतो. लहान अल्पभूधारक शेतकरी स्पर्धेत टिकून शकत नाही. तो कितीही धडपडत असला तरी, खुल्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने त्याचं मरणच होतं. त्याच जगणं,-मरण, शेतीच्या भरवशावर ठरणार .,नफा,तोटा, सुखदुःख, शिक्षण, आरोग्य, नोकरी, छान शौक, राहणीमान, सोयरिक संबंध, सिंचन सुविधा, लाईट, पाणी, दळणवळणाची साधने उपलब्धता , शेती संशोधन आधुनिक अवजारे, अशिक्षित शेतकरी, शेती विषयक रोजगार याचा विचार शेतीनिष्ठ जाणिवेतून करणे भागच आहे. या बाबतीत विचार केला असता शेतकऱ्यांच्या जीवनमानावर आपसूकच अनकेविध लहान लहान समस्याचा प्रभाव पडतो.भारतीय ७०/ टक्के लोक जीवन शेती आधारित समाजजीवन कृषिप्रधानच आहे. यात शंकाच असूनये. ग्रामीण भागातील लोक इतर कामधंदे जरी करित असले तरी, शेतीवर संपूर्ण तेथील जीवन अवलंबून आहे.अशा शेतकऱ्यांच्या सर्वंकष जीवनपरिघाचा विचार कृषीप्रधानतेच्या अंगांनी जो संवेदनशील लेखक करतो,त्या जाणिवेतून प्रभावित होतात जीवन अनुभवत जगणं ,त्याच मातीतल्या माणसांच्या व्यथा समजून घेण्याच्या दृष्टीने कृषीप्रधान समाज जीवनाला मुख्य केंद्र समजून, केलेलं लेखन शेतकरी समाज व्यवस्थेच सर्जनशील भाष्य असतं, आहे . एखाद्या लेखक बहुसंख्येने असलेल्या शेतकरी समाजाच्या एखाद्या प्रश्नाच्या मुळाशी जाऊन हेतूत: शोध घेतो. शेतीनिष्ठ जगनाऱ्या शेकऱ्यांच्या विविध समस्यांच्या मुळाशी जाऊन शेतकरी समाजाच्या बहुविध व्यथा वेदनांवर कलात्मक भाष्य करणारी कलाकृती, निर्माण केली. त्या कथेला, नाटक, कादंबरीला ग्रामीण कृषिप्रधान लेखन म्हटले पाहिजे. अशा लेखनास 'कृषिप्रधान प्रवाह' म्हटल्यास हरकत नसावी.

ग्रामीण समाज जीवनाच्या परिघात घडणार कोणतीही कलाकृती शेतीनिष्ठ जीवन अनुभूतीचा कलात्मक अनुभव आहे. त्याला कृषीप्रधान ग्रामीण कादंबरी म्हणावे. केवळ गावगाडा, अलुतेदार बलुतेदार, प्रथा ,परंपरा, ग्रामदैवत, .जत्रा ,नवस, कारू- नारू व्यवहार पध्दत, परंपरागत शेतकरी, शेती अवजारे, गुरेढोर,े निसर्ग ,सण उत्सव, विधी , संस्कार, संस्कृती या अंगाने आजवर अनेक लेखक लिहिताना दिसून येतात.आज ते नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. लक्षात घ्या की, .आज शेतीनिष्ठ जीवन अमुलाग्र बदलेले आहे. सर्वांकस कृषी संस्कृतीत अमुलाग्र बदल झाले आहेत.कालौघात गतीने सुरू झालेल्या या बदलांना समजून घेणे आवश्यक आहे. काळाची सोबत करणाऱ्या संवेदनशील लेखकांनी आपला समकाल समजून घेणे गरजेचं असते. आजचे कृषी प्रधान समाज जीवनातील विविध नव्या प्रश्नांना समजून घेऊन ,दर्शन घडवणाऱ्या अनेक कादंबऱ्या लक्ष

International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

वेधून घेतात. त्यामध्ये बारोमास, कापूस कळा, विजेने चोरले दिवस, सेझ, कोयत्यावरचे कोक, पांढरा सोनं, पाडा, या प्रमुख उल्लेखनीय कादंबऱ्या होत. शेती व्यवस्थेच्या पडझडीचे , त्यांच्या दुःख ,व्यथा वेदनेचे प्रत्येयचित्र या कादंबऱ्यातून घडल्याचे लक्षात येते.शेतकऱ्याच्या रोज मरणाऱ्या जीवनात काळानुसार अनेक समस्यांनी घर केले आहे. अल्प शेती असलेले कृषीनिष्ठ समाज जीवन बोथट, हीनदीन आहे .एकूणच जमीन व्यवसाय कनिष्ठच ठरत आहे. कोणीही मी शेतकरी म्हणून पुढे येईल ,नाव कमवेल,असे आत्मविश्वासाने कुणी बोलत नाही. कारण शेती हा व्यवसाय नेहमीच बीनभरवशाचा आहे . आजचे तरूणपिढीला या व्यवसायचे नादी लागून बर्बाद व्हायचे नाही, असे खूदद शेतकऱ्यांचे मुलं म्हणतात. इतरांच्या गावी तर शेती व्यवसाय म्हणजे मुर्खपणा ठरतो. शेतीची निराशाजनक स्थिती का झाली?.कोणते प्रश्न आहेत ?. याबाबतीत जानकर लेखक लिहिताना पुढे येत आहेत. लोडशेडींग शेतीला किती घातक ठरते .किती कठीण आहे. हा नवाच विषय घेऊन 'विजेने चोरलेले दिवस' ही कांदबरी लिहिली आहे. शेतीची निराशाजनक चिखलवाट कुणी तुडवायची ? . संतोष जगताप लिखित कादंबरी 'विजेने चोरलेले दिवस' या कादंबरीतील डीके सर म्हणतात" कुठे बुद्धी सूचीली न शेतीच्या नांदी लागलो?काय कळंना झालंय बघा. रान विकून सांगोल्यात प्लाट घेतला असता तर असलं हेंपन लागली नसती माग." शेती म्हणजीं जुगार झालायं नुसता ओपन जेवू देत नाही न क्लोज झोपू देत नाय .काय तर म्हणे जगाचा पोशिंदा!. पृष्ठ ३२.असे डीकेसरचे बोलंन म्हणजे शेती व्यवसाय स्वतःला उध्वस्त करणारा व्यवसाय वाटते. शेतकऱ्याची निर्भसना होताना या कादंबरीतील मुख्य पात्र जगू माळी म्हणतो शेतकरी म्हणजे कस्पटासमान क पदार्थ अशीच अवस्था झाली आमची.. "आमदार ,खासदार, इंजिनिअर असं मानानं मिरवायला नाही येण्यासारखं आमचं काही त्येत. शेतकरी व्हय तर कोण, शे.म्हणजे शेकड्यांनी मरणारा, शे म्हणजे शेपूट घालून जगणारा, शे.म्हणजे शेळपाटण, शे म्हणजे --कंशांत अस काहीहीे म्हत्यात.".पृ ६.हे स्वतःच्याही नजरेतन उतरणं झाले.ंभारतीय शेती लोडशेडींग मुक्ती नाही . लाईट नसेल तर, सर्व कामे ठप्प. अठरा अठरा घंटे भारनियमन करने म्हणजे शेतकऱ्यांना छळण्याचा प्रकार आहे हा. लोडशेडींग म्हणून शेतात दारं धरावं रात्री जागून काढाव्या लागतात आम्हासी.अशी विदीर्ण स्थिती आहे शेतकरी समाजाची.े. "काळोख्या अंधारात कितीतरी शेतकरी साप विंचू चावून मरतात. कोणी विहिरीत पाय घसरून मरतो, कोणी करंटन. अशा पेपरला बातमी येतात. पावरफुल लाईट शहरात. खेड्यात नेहमीच डीम लाईट.पृ.८८.हा लोडशेडींग विषय गंभीर परिणाम शेतीवर करणारा आहे त्यानिमित्त सगळं गाव वेठिस धरलं जातं, कौटुंबिक ताणतणाव वाढतात, पाणी असूनही लाईट नाही तर पिके करपून जातात त्यामुळे मोठं नुकसान सहन करावे लागत.लाईटडीम असेल तर मोटारी चालत नाही, एका डीपीवर पन्नास कनेक्शन,त्यापाई नेहमी बीपी जळतो,शेतपिक पाण्यावर आलेल बीपी दुरुस्त करण्यात चालढकल केली जाते,एमएसबीचा साहेब त्रास पैसा जमा करावे लागते, असे विविध बारिक बाबतीत लेखकाने चिंतन केले आहे.हे केवळ शेतकरी समाजाच्या बहुविध शोषणाचे स्तर किती प्रभावी वास्तव आहे हे लक्षात येते. लोडशेडींग शेतीला कशे प्रभावित करते राबत जगू माळी सांगतो." गुराढोरांना पाणी कसं पाजायचं? पिकाला पाणी कशाच्या भरोशावर द्यायचं ? आयुष्याचे मातेरे करणारं हे लोडशेडींग शेतकऱ्यांच्या जीवावर उठते. एसीच्य गारव्यात सुखी झोपणारा शहरातला वर्ग आणि रात्री बे रात्री शेतावर पिकाला पाणी देणारे शेतकरी का आली आली लाईट आल.ी गेली गली लाईट गेली. असं पोरखेळ हाय का? शेतीकरन." पृ ६७ . हे कृषीप्रधान देशाचे आजचे चित्र 'अन्नदाता सुखी भव 'म्हणणारी कोरडी सहानुभूती नको अशी खंत जगताप नोंदवता, . भाव वाढीचा प्रश्न असेल, बी, बियाणे ,खतं कीटकनाशक यातून होणारी नफेखोरी असेल ,ओला,सुखा दुष्काळ असेल, सिंचनाच्या सोयीतील अडथळा ,विजेचं भारनियम असेल, शेतीचे अधिग्रहण असेल, अशा विविध नवख्या प्रश्नांना समजून घेण्याच्या उद्देशान समकालीन कादंबरीकार म्हणून हेतू पूर्ण लिखाण करणाऱ्या पैकी सदानंद देशमुख, वासुदेव मुलाटे, बाबाराव मुसळे, रविंद्र किंभहुणे, शंकर सखाराम,श्रिकांत देशमुख, आसाराम लोमटे ,नामदेव माळी, संतोष जगताप, किरण गुरव, कैलास दौंड, अशोक कौतिक कोळी, उत्तम कांबळे, प्रविण बांदेकर, चंद्रकांत वानखेडे, दिनकर दाभाडे, यासारख्या प्रतिभावंत साहित्यिक कादंबरीकारांनी शेतकऱ्याच्या कृषीप्रधान जीवनाची बहुमितीय समस्यां, प्रश्नांना, समजून घेण्याच्या उद्देशाने हेतू पूर्ण लिखाण केले आहे. प्रामुख्याने वास्तव समजून चिंतन केले आहे. कृषीनिष्ठ समाजाचे नव्याने निर्माण झालेल्या प्रश्नांना घेऊन ई.स.२००० नंतरच्या काळातील एक नाव संतोष जगताप यांचेआहे. सिमित वाटत असलेला विजेचं भारनियमन सारखा नवीन प्रश्न त्याचा दुष्परिणाम भोगत असलेले शेतकरी समाजाच्या जीवनाला विविध अंगांनी प्रभावित करणारे ठरते, याचा प्रत्यय येतो. ग्रामीण भागातील लोडशेडींग शेतीला कशे प्रभावित करते. शेती व्यवसायवर जगणं किती कठीण होते. कमी दाबाने वीज, त्यामुळे मोटारी जळनं,लोड आल्यामुळे डीपी जळनं नवीन डीपी घेणेसाठी वर्गणी गोळा करणे, त्यात साहेबांचा भ्रष्टाचार, वायरमनच्या मिनतवाऱ्या, आकडा टाकून विजघेणं, कोणी कंप्लेंट केली, रात्री शेतावर जाऊन पाणी देणं, जीवनाची बाजी लावून शेती करावी लागत . विज चोरकरणे नाव सांगितले तर भांडणं होतात, त्यातून खून केल्याची घटना होते.

International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

वैमनस्य वाढते.लाईट अभावी पिके करपून जातात .पाणी आहे परंतु उपसा कसे? लोडशेडींग.असे विविध धोके ,सुक्षम बीबीचा विचार करून जगताप यांनी प्रभावीपणे भारनियमनाचा मराठी ग्रामीण कादंबरीला अस्पर्शित विषय घेऊन वैशिष्ट्यपूर्ण मांडणी केली. ,वास्तवाभिमुख चित्रण 'विजेने चोरलेले दिवस' या कादंबरीत संतोष जगताप यांनी केले आहे .

उत्पादन वाढीच्या आशाने, राबणाऱ्या शेतकऱ्यांना डोळ्यासमोर आपल्या शेतातील उभे पिके पाण्याअभावी करपून जात आहे हे पाहण्याची दुर्दैवी वेळ येते. तेही पाण्याची सोय असतांना , कारण काय तर विजेचं भारनियमन, लोडशेडींग समस्या.ती केवळ लाईट नसणं एवढ्या पुरतीच सिमित राहत नाह, तर शेतीनिष्ठ जगनच कसे उध्वस्त करते याचे वास्तववादी चित्र 'विजेने चोरलेले दिवस' या कादंबरीत संतोष जगताप यांनी केले आहे.कृषी जीवनाचे कृषिप्रधानतेच्या अनुषंगाने शेती आधारित समाजजीवनाची होरपळ मनाला विलक्षण भावते. हा लोड शेडिंग चा प्रश्न किती शेतकऱ्यांचा जीव घेतो याविषयीचे चिंतन करण्यास भाग पाडते . शेतकऱ्यांच्या शोषणाचे स्तर बदलत आहेत.बाजार यत्रंनेकडून होणारी प्रचंड पिळवणूक पाचवीला पुजलेली. याबाबत या कादंबरीतील जगू माळी म्हतो". किलोला सोळासे रुपये दराच्या शाम्पूचा फेस करतांना येत नाही का कंडूच्या गांडीला फेस? पंचवीस लाखांच्या गाडीत बसून कुतमिराची जुडी चार आण्याला मांगतांना कडुस्यनी लाजबी वाटत नाय"पृष्ठ.६६. हा जळफळाट आक्रंदन शोषित व्यवस्थेला सवाल करणारी अनेक पात्रं 'विजेने चोरलेले दिवस 'या कादंबरीत भेटतात. ही पात्रांच्या तोंडी आलेली भाषा शेतकरी समाजाच्या शोषणाची परिसिमा गाठली याच हे. स्फोटक चित्र आहे.या कादंबरीतील लोडशेडींगचा प्रश्नांना सोबतच पर्यायी शोषणाचे भिन्न मार्ग ही अधोरेखित केले आहेत. शेतकऱ्याच्या उद्धारासाठी सोसायटी स्थापन केल्या ,पण शेतकऱ्यांच्या उन्नातीसाठी या सोसायटीतर्फे काम करताना दिसत नाही .त्या केवळ कार्यकर्ते पोसण्यासाठी आडदांड धनदांडग्या लोकांना कुरणं ठरली आहेत .साखर सम्राट ,सहकार सम्राट ,म्हणून पुढे येऊन, दूध डेरी संघ काढून, खरेदी विक्री संघ ,अडत बाजार , सहकारी बँक, इत्यादींच्या माध्यमातून शेतकऱ्याच्या घामाचं रक्त शोषणारी ढेकन उभी ठाकली. सरकारचं धोरण आणि शेतकऱ्याचे मरण अशी म्हणण्याची वेळ आली. सबसिडी, अनुदान,विजमाफी, कर्ज माफी,फुकटच कंट्रोल गहू तांदूळ, यामुळे परावलंबित्व आले. मंजूर मिळेनासे झाले.ही बाजू ही जाणिवही संतोष जगताप मांडतांना दिसतात. . खुल्या अर्थव्यवस्थेच्या धोरणाचा धोका लक्षात न घेता अल्पभूधारक शेतकऱ्यावर वरवंटा फिरवला गेला. ते लिहितात "एक उद्योगपती आपल्या बायकोसाठी सतत्ताविस मजली बंगला बांधतो, आम्हाला अजेबात राग नाही त्यचं.त्येनला लखलाभ असो.आमच म्हणण एवढंचाय त्येच्या कष्टाच चीज होत; आमच्या का नाय होत? त्येची अडचणी सोडवायला अख्यं सरकार धांवत सुटतं अन् आम्ही विज भेटत नाय , मालाला योग्य भाव नाय,शेताला पाणी नाय ,, आमी माणसं नाय व्हय?बील भरले नाही तोडा कनेक्शन , कर्ज भरलं नाही करा जप्ती, अन् मोठाले उद्योगवाले लाखो हजार कोटी रुपये बुडवून तरी प्रतिष्ठित, त्यांना जमीन फुकट, पाणी फुकट आणि आम्ही एक लाख रुपये कर्ज भरलं नाही ,भरता आले नाही म्हना, म्हणून आत्महत्या.हाय उत्तर? [113]

असे जगू माळी सांगतो तेव्हा त्याला एकाला असे म्हणावे लागले असे अजिबात नाही. त्यांच्या रुपाने संपूर्ण शेतकऱ्यांच्या वतीने त्यानं म्हटले आहे ही सूचकता शेतकरी आक्रमक भूमिका घेऊन पुढे येईल. सूचकपणे अभिव्यक्त होत आहे. समग्रपणे शेतकऱ्यांच्या सर्वंकष शोषणाचे गणितं रचण्यात काही घटक कारणीभूत आहेत. अडते, व्यापारी, भांडवलदार, सावकार ,अधीकारी, शासक, राज्यकर्ते, मंदिर, मठ,पुरोहित, सत्ते, परंपरा , रूढ ,देवदेवता, . कारखानदार, लोडशेडींग, विकास प्रकल्प इत्यादी घटकांनी मिळून शेतीनिष्ठ जीवनाची शोषणव्यथा ा बहुमितिय स्वरूपाची निर्माण केली जात आहे. याचं सुचक वास्तववादी चित्रण कृषिप्रधान ग्रामीण कादंबरी म्हणून 'विजेने चोरलेले दिवस' या कादंबरीतून निवेदित होते.

सारांश -

मराठी ग्रामीण कादंबरीला सर्व अर्थाने अपरिचित असलेला लोडशेडींग समस्येचा विषय 'विजेने चोरलेले दिवस' या कादंबरीत त्याच्या दुष्परिणामांची ओलाडलेली बेदखल परिस्थिती अभिव्यक्त झाली आहे. शेतकऱ्यांच्या सर्वंकष कृषिप्रधान जीवनाची बहुमितीय व्यथा मांडणारी ही कांदबरी आहे. लोडशेडींग निमित्ताने शेतकरी जीवन बाधीत करणारे अनेक छुपे शक्ती पुढे येऊन शेतकरी समाजाला कशाउध्वस्त करतात याचा प्रत्यय येतो.. लोडशेडींग मुक्ती नाही.शेतीला आव्हान आहे.असा मराठी ग्रामीण कादंबरीला अस्पर्शित विषय जगताप नोंदवता. लोडशेडींग प्रश्न सर्वदूर कमी अधिक प्रमाणात भेडसावत आहे.हे वास्तव नाकारता येणार नाही. शेतकऱ्यांच्या संपूर्ण जीवनाला त्यासंबंधी विविध स्तरीय घटकांना बाधा निर्माण करतो. याचं सुचक वास्तववादी चित्रण, कृषिप्रधान जीवनाची वाताहत या कादंबरीत आह.े हा प्रश्न लोडसर्डिंग पुरता मर्यादित न राहता शेतकऱ्याच्या अख्या जीवनाला हर्तरेने कसा उध्वस्त करतो याच्या बारीकसारीक तपशिलासह सांगोला परिसरातील भाषेसह परिसरातील बोलीभाषेसह प्रखर वास्तव जीवन, नवीन प्रश्नाची े चिंतनशील मांडणी संतोष जगताप यांनी केली आहे. .

1. संदर्भ : मुलाटे, वासुदेव, ग्रामीण साहित्य: चिंतन आणि चर्चा, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, 2005.
2. पुटवाड , माधव , ग्रामीण समाज आणि साहित्य: सद्यस्थिती ,बळीवंश प्रकाशन नांदेड, 2013
3. जगताप, संतोष, विजेने चोरलेले दिवस, , दर्या प्रकाशन पुणे. , 2008
4. पठारे, रंगनाथ , आजची कादंबरी नोंदी आणि निरक्षणे , शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर, 2014 .
5. सानप, किशोर ,मराठी कादंबरी: नव्या दिशा, निर्मल प्रकाशन नांदेड, 2005 .
6. बनसोडे ,प्रवीण , जागतिकीकरण व ग्रामीण साहित्य, कीर्ती प्रकाशन , 2018.
7. दळवी, संदीप, शेतकऱ्याच्या शोषणाचा अविष्कार, मुक्त शब्द जुलै, 2021.
8. राऊत, ज्ञानदेव, शेतकऱ्याच्या दहाक वर्तमानाचा अस्वस्थ वेध, प्रतिष्ठान, मे 2020.
9. दौड, कैलास, विजयने चोरलेले दिवस शेतीव्यवस्थेच्या पडझडीचा अंतरछेद. भावमाला, एप्रिल 2020.